<u>सं. फौ. ख. क्र.५६८/२०१८</u>                                   निशाणी २३

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.४ यांचा शपथेवर जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – अहमद नौशाद शे. मुनीर

वय – ६१ वर्षे,                    व्यवसाय – सेवानिवृत्त, एएसआय

पत्ता – रा. संत कबीर नगर, अकोट फाईल, अकोला, ता.
जि. अकोला.

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती एस. आर. लोखंडे यांचेमार्फत सरतपास सुरुः</u>**

१. मी बाळापुर पो.स्टे. येथे हे. कॉ. म्हणून सन २०१७–२०२२ या कालावधीमध्ये कार्यरत होतो. अप क्र.४४०/२०१८, भादंवि कलम २७९, ३३७, ४२७ व मो. वा. कायदा कलम १८४ या गुन्ह्याचा तपास माझ्याकडे वर्ग करण्यात आला होता. सदर तपासकामी माझ्याकडे एफआयआर, जबानी रिपोर्ट व केस डायरी इ. येथील सर्व कागदपत्र प्राप्त झाले होते. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून आले की, एस. टी. क्र. एमएच२०/बीएल/३०३५ हे वाहन अकोला येथून खामगाव कडे जात असताना भिकुंड नदीजवळ उभे असलेल्या ट्रक क्र.एमएच१२/एफझेड/९५६२ यास मागून ठोकर मारुन ट्रकच्या मागच्या फालक्याचे व एस.टी.चे समोरील बंपर, हेड लाईड याचे नुकसान केले. तसेच एस.टी.मधील आत बसलेल्या १५–२० प्रवाशांना मार लागून जखमी केले.

२. दि.०२.१०.२०१८ रोजी मी दोन पंचांसमक्ष घटनास्थळी गेलो व घटनास्थळ पंचनामा केला. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला त्यावर दोन पंचासह माझी सही असून त्यातील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२४** देण्यात येत आहे. सदर एस.टी. तील जखमी हे अकोला येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते त्यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र सदर तपासकामी मी प्राप्त केले. तसेच सदर अपघातातील जखमी यांचे बयाण त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंद केले.

३. सदर अपघातातील एस.टी.चे कागदपत्र संबंधित एस.टी. कर्मचाऱ्यांकडून प्राप्त केले. त्याच प्रमाणे चालकाचे वाहन चालविण्याचा परवाना प्राप्त केला. एस.टी. चालक

हा अपघाताच्या दिवशी कर्तव्यावर हजर असल्याबाबतचा त्याचा दाखला प्राप्त केला. तसेच वाहनाचा रोजनामा प्राप्त केला. आता मला दिनांक ०४.१०.२०१८ रोजीचा दाखला दाखविण्यात आला. त्यास **नि.क्र.२५** देण्यात येत आहे.

४. ट्रक चालकाचा वाहन चालविण्याचा परवाना, इन्शोरंस पेपर, फिटनेस सर्टीफिकेट व ट्रान्सपोर्ट सर्टीफिकेट व आधारकार्ड प्राप्त केले. त्यास एकत्रीतणे **आर्टीकल १** देण्यात येत आहे. आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने त्याच्या विरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. सदर अपघातातील जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्रे प्राप्त करण्याकरीता माझ्या सहीचे दि.०२.१०.२०१८ चे पत्र आता मला दाखविण्यात आले त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२६** देण्यात येत आहे.

५. सदर एस.टी. चालक हा सदरहू वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविण्याने समोर उभे असलेल्या ट्रकला ठोस मारुन त्याचे नुकसान केले व एस.टी.चे नुकसान केले तसेच बसमधील प्रवाशांना जखमी होण्यास कारणीभूत ठरले. याबाबत, सबळ पुरावा मिळून आल्याने त्याच्या विरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. मी सदर एस.टी. चालकास पाहिल्यास मी ओळखू शकतो. आरोपी आज न्यायालयात उपस्थित नाही, त्याच्या ओळखीविषयी त्यांच्या वकीलांमार्फत कोणताही वाद उपस्थीत नसल्याचे सांगितले.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. ए. जी. अवातिरक यांचे मार्फत उलटतपासः</u>**

६. सदर तपासादरम्यान मी बस मधील जखमींचे त्या दिवशीचे बस तिकीटे तसेच सदर एस.टी. वाहकाचे लॉगबुक जप्त केले नाही. सदर बसचे ब्रेक हे व्यवस्थीत काम करीत नसल्याबाबत मी कोठेही त्याबाबत एस.टी. महामंडळाकडे चौकशी केली नाही. आता मला वाहनाचा रोजनामा दाखविण्यात आला. सदर दस्त हा उलटतपासामध्ये दाखविल्याने त्यास **नि.क्र.२७** देण्यात येत आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा मी पो.स्टे. येथे बसून तयार करुन त्यावर नेहमीच्या पंचांच्या सह्या घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की, मी

माझ्या सरतपासादरम्यान कथन केलेल्या सर्व बाबी खोट्या सांगितलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– २१.०४.२०२६**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE

Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2026.04.21 16:18:23 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

प्रमाणपत्र

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. डी. एम. वाघमारे,** सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | २१/०४/२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | २१/०४/२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | २१/०४/२०२६ |